क्र. पोउपा/शवाशा/प्रशा-१/ ८७ /२०२२
पो. उपायुक्त शहर वाहतूक शाखा यांचे कार्यालय,
ठाणे. दि. २८/८/२०२२

## वाहतूक नियंत्रण अधिसुचना – सुधारणा

**विषय :–** अधिसुचनेमध्ये सुधारणा होणेबाबत.

**संदर्भ :–** १) OW/DCP TRAFFIC THANE/CP-THANE/NOTIFICATION/66/2018, १०/०९/२०१८

*******

**ज्याअर्थी,** ठाणे शहर वाहतूक विभागाचे कार्यक्षेत्रात दिनांक ३१/०८/२०२२ ते दिनांक ०९/०९/२०२२ या कालावधीत गणेशोत्सव हा सण साजरा होणार असून गणेशमुर्ती विसर्जनाचे दिवशी दिनांक ०१/०९/२०२२ रोजी दिड दिवसांचे गणपती विसर्जन, दिनांक ०४/०९/२०२२ व दिनांक ०५/०९/२०२२ रोजी गौरी गणपती विसर्जन, दिनांक ०६/०९/२०२२ रोजी सात दिवसांचे गणपती विसर्जन आणि दिनांक ०९/०९/२०२२ रोजी अनंत चर्तुदशी या कालावधीत गणेश मुर्ती विसर्जन व मिरवणूकांचे मोठया प्रमाणात आयोजन करण्यात येते. सदर सणानिमित्त जनसमुदाय रस्त्यावर असतो.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाकडून कोरोना रोगाच्या प्रादुर्भावाचे वेळी लावण्यात आलेले निर्बंध हटविण्यात आल्याने मोठया प्रमाणात जनसमुदाय गणेश विसर्जन व मिरवणुकांमध्ये सामील होणार आहे. जड – अवजड वाहतूक सुरू ठेवण्यात आली त्या दरम्यान गणेश मूर्ती स्थापना किंवा विसर्जन होण्यापुर्वी काही अप्रिय घटना घडू शकते.

**ज्याअर्थी,** ठाणे शहर वाहतूक विभागातून तीन राष्ट्रीय महामार्ग व एक राज्य महामार्ग मार्गस्थ होत आहेत. नमूद महामार्गावरून बाहेरील राज्यांमध्ये जाणा–या व बाहेरील राज्यांतून येणा–या वाहनांची वाहतूक सुरू असते. जड – अवजड वाहनांमुळे ठाणे शहर वाहतूक विभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये गणेशोत्सव दरम्यान वाहतूक कोंडी होईल. त्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून ठाणे शहर वाहतूक विभागातील अंतर्गत मार्गावर जड – अवजड वाहनांना प्रवेश बंदी बाबत आदेश काढणे आवश्यक असले बाबत माझी खात्री झालेली आहे.

**त्याअर्थी,** मी जय जीत सिंह, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र. एम.व्ही.ए. –११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून यापुर्वीचे अधिसुचना क्र. OW/DCP TRAFFIC THANE/CP-THANE/NOTIFICATION/66/2018, १०/०९/२०१८ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे.

**प्रवेश बंद –** सर्व प्रकारच्या जड – अवजड मालवाहतूक करणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाचे सर्व शहरांचे मार्गावरून मार्गस्थ होण्यास गणपती विसर्जन/ मिरवणुक दिवशी दिनांक ०१/०९/२०२२, ०४/०९/२०२२, ०५/०९/२०२२, ०६/०९/२०२२ व दिनांक ०९/०९/२०२२ रोजी सकाळी ०६:०० ते गणेश मूर्ती विसर्जन मिरवणूक संपेपर्यंत प्रवेश बंद राहील. तसेच दिनांक ३१/०८/२०२२ ते दिनांक ०९/०९/२०२२ या कालावधीत गणपती विसर्जन दिवस सोडुन इतर दिवशी जड अवजड वाहनांना रात्री २२:०० ते सकाळी ०६:०० वाजेपावेतो वाहतुकीस मुभा देण्यात येत आहे.

२८.८.२२
( जय जीत सिंह )
पोलीस आयुक्त, ठाणे शहर.

**प्रति,**

संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री, चर्नी रोड, मुंबई.

२/– आपणास विनंती करण्यात येते की, वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना सुधारणा केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रत,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना रद्द केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

CS CamScanner

**प्रत मा. सविनय सादर,**
जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई.
अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, ठाणे शहर, नवी मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी,**
अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण व ठाणे,
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर व नवी मुंबई.
पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे व नवी मुंबई.
पोलीस उप आयुक्त, विषेश शाखा,ठाणे शहर
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३ कल्याण, परिमंडळ –४ उल्हासनगर

**प्रत** :– आयुक्त ठाणे, भिवंडी निजामपूर शहर, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद.

**प्रत** :– मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई.

**प्रत** :– स्विय सहायक, मा. पालकमंत्री, जिल्हा ठाणे.

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना रद्द करण्यात आले बाबत नोटीस मध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सर्व संबंधित वाहतूक संघटना.

CS CamScanner